**महाराष्ट्र शासन**

क्र. अधापु २०१५/ प्र.क्र. ११२/ना.पु.-२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ ऑगस्ट, २०१५.

प्रति,

१) जिल्हाधिकारी, औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा

२) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी (औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वर्धा ,

**विषय** :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, अंतर्गत समाविष्ट न झालेल्या राज्यातील चौदा जिल्ह्यातील एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेप्रमाणे अन्नधान्याचा लाभ देण्यासाठी मासिक नियतन **माहे ऑगस्ट, २०१५.**

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्रमांक अधापु२०१५/(प्र.क्र.१००)/नापु-22, दिनांक २४/०७/२०१५.
२) केंद्र शासनाचे क्र. २/महाराष्ट्र/२०१५- बीपी-III, दि. ५/८/२०१५ चे पत्र.
३) शासन निर्णय क्रमांक अधापु२०१५/(प्र.क्र.१००)/नापु-22, दिनांक ५/०८/२०१५.

माहे जून, २०१५ मध्ये सुरुवातीस झालेल्या पावसानंतर महाराष्ट्र राज्यातील अनेक भागात पाऊस पडलेला नाही. शेतपिकांकरिता आवश्यक प्रमाणात पाऊस न पडल्यामुळे शेतकरी हवालदिल होऊन आत्महत्या करण्याचे प्रमाण गत काही वर्षात वाढले असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याची घटना या वर्षात होऊ नये, या दृष्टीने औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना, नांदेड, बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, हिंगोली, अमरावती विभागातील अमरावती, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व नागपूर विभागातील वर्धा या १४ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेच्या धर्तीवर सवलतीच्या दराने अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत उपरोक्त संदर्भाधीन दिनांक २४/७/२०१५ रोजीच्या शासन निर्णय निर्गमित केला आहे.

त्याअनुषंगाने लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये ज्या लाभार्थ्यांना सवलतीच्या दराने अन्नधान्याचा लाभ मिळत होता, परंतू राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाने घालून दिलेल्या लाभार्थ्यांच्या इष्टांकाच्या मर्यादेमुळे जे लाभार्थी राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये समाविष्ट होऊ शकले नाहीत, अशा एपीएल (केशरी) मधील लाभार्थ्यांतील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेमध्ये प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांना ज्या दराने व परिमाणात अन्नधान्याचा लाभ दिला जातो, त्याच परिमाणात व त्याच दराने अन्नधान्याचा लाभ द्यावयाचा आहे. लाभार्थ्यांच्या निवडीबाबत संदर्भाधीन शासन परिपत्रक दि. ५ ऑगस्ट, २०१५ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार लाभार्थ्यांची निवड तात्काळ करावी.

या लाभार्थ्यांना अन्नधान्य देण्याकरिता ते केंद्र शासनाकडून Economic Cost ने खरेदी करण्यात यावे. केंद्र शासनाच्या भारतीय अन्न महामंडळाकडून ₹ २२६७/- प्रति मे. टन दराने गहू व ₹ ३१३४/- प्रति मे. टन दराने "अ" दर्जाचा तांदूळ खरेदी करण्यात यावा. लाभार्थ्यांना तांदूळ ₹ ३/- प्रतिकिलो व गहू ₹ २/- प्रतिकिलो या दराने धान्य वितरीत करण्यात यावे.

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. ५/८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये Economic Cost ने गहू ६६०० मे.टन व तांदूळ ४४०० मे.टन उपलब्ध करुन दिला आहे. दिनांक २४/७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय

अन्न सुरक्षा योजनेत समाविष्ट नसलेल्या एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना धान्य देण्यासाठी याद्वारे नियतन मंजूर करण्यात येत आहे. जिल्हानिहाय मासिक नियतनाचा तपशिल सोबतच्या विवरणपत्र **"अ"** मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**शासन निर्णय दिनांक २४/७/२०१५ नुसार विहित केलेल्या परिमाणाच्या मर्यादेत गहू व तांदळाचे वाटप करावे.**

२. सदर पत्रामध्ये नमूद केल्यानुसार माहे ऑगस्ट, २०१५ च्या नियतनाच्या उचलीचा व रकमा जमा करण्याचा कालावधी दिनांक ५/९/२०१५ राहील. अंतिम दिनांकाची वाट न पाहता विहित मुदतीत रक्कम जमा करुन, नियतनानुसार संपूर्ण धान्याची उचल करुन व रु.३/- प्रतिकिलो दराने तांदूळ व रु.२/- प्रतिकिलो दराने गहू या सुधारित दराने निश्चित केलेल्या परिमाणात वाटप होईल याची दक्षता घ्यावी.

३. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश ई-मेलद्वारे व उपआयुक्त (पुरवठा) यांना फॅक्स व ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. नियतन मंजूरीचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे धान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

४. **भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून गहू व तांदूळ स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे धान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच धान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

५. शिधापत्रिकाधारकास रास्तभाव धान्य दुकानांच्या माध्यमातून सदर धान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना दयाव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

६. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, २००१ मधील तरतुदीनुसार "उपयोगिता प्रमाणपत्र" नियमितपणे सादर करणे अनिवार्य आहे.

७. सोबतच्या विवरणपत्रांतील नियतनाच्या तक्त्यांमध्ये दर्शविलेल्या परिमाणानुसारच लाभार्थ्यांना धान्याचे वितरण करणे अनिवार्य आहे.

८. माहे ऑगस्ट, २०१५ साठी उक्त लाभार्थ्यांकरीता नियतनानुसार गहू व तांदुळाचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्रपणे देण्यात आल्या आहेत.

९. मंजुर नियतनानुसार लाभार्थ्यांकरीता गहू व तांदळाची उचल करुन वाटप करावे व केलेल्या उचल व वाटपाची माहिती न चुकता "महाफूड" आज्ञावलीत दर आठवडयास वेळीच भरावी. नियतन, उचल व वाटप यासंबंधीची माहिती वेबसाईटवर प्रदर्शित करण्याबाबत शासन स्तरावरुन वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून केलेल्या उचलीबाबतची व रास्तभाव दुकानदारांनी केलेल्या उचलीबाबतची माहिती दररोज उपसंचालक, नागरी पुरवठा यांना सादर करावी.

**( वि. द. शेवडे )**
**अवर सचिव**

सोबत:- विवरणपत्र **"अ"**

प्रत:-

१) उप आयुक्त (पुरवठा) औरंगाबाद, अमरावती, नागपूर (फॅक्सद्वारे)

त्यांना सूचित करण्यात येते की, नियतनाचे आदेश सर्व जिल्हयांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्हयांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील सर्व जिल्हयांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती **"महाफूड"** आज्ञावलीत दर आठवडयास भरली जाण्याची योग्य ती दखल घ्यावी.

२) **उपसंचालक, नागरी पुरवठा**,पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, **मुंबई**, यांनी प्रस्तुत नियतनानुसार जिल्हयांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील **"महाफूड"** आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांनी प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करावी.

**( वि. द. शेवडे )**
**अवर सचिव**

सोबत:- विवरणपत्र **"अ"**

प्रत :- १) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
२) निवड नस्ती (कार्यासन, नापु-२२)

विवरणपत्र "अ"

शासन पत्र क्र. अधापु-२०१५/प्र.क्र.100/नापु-२२, दि.७/८/२०१५ सोबतचे विवरणपत्र

**राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, 2013 अंतर्गत समाविष्ट न झालेल्या एपीएल (केशरी ) लाभार्थ्यांपैकी शेतकऱ्यांना द्यावयाच्या अन्नधान्याचे नियतन (माहे ऑगस्ट २०१५)**

| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्यसंख्या | नियतनाचे परिमाण | | नियतन (मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण अन्नधान्य |
| 1 | 2 | 3 | | | 4 | 5 | 6 |
| 1 | औरंगाबाद | 435184 | 3 | 2 | 1306 | 870 | 2176 |
| 2 | जालना | 52394 | 3 | 2 | 157 | 105 | 262 |
| 3 | नांदेड | 184848 | 3 | 2 | 555 | 370 | 925 |
| 4 | बीड | 173148 | 3 | 2 | 519 | 346 | 865 |
| 5 | उस्मानाबाद | 163640 | 3 | 2 | 491 | 327 | 818 |
| 6 | परभणी | 161825 | 3 | 2 | 485 | 324 | 809 |
| 7 | लातूर | 111012 | 3 | 2 | 333 | 222 | 555 |
| 8 | हिंगोली | 107485 | 3 | 2 | 322 | 215 | 537 |
| 9 | अमरावती | 205510 | 3 | 2 | 617 | 411 | 1028 |
| 10 | वाशिम | 90259 | 3 | 2 | 271 | 181 | 452 |
| 11 | अकोला | 102554 | 3 | 2 | 308 | 205 | 513 |
| 12 | बुलढाणा | 121086 | 3 | 2 | 363 | 242 | 605 |
| 13 | यवतमाळ | 60653 | 3 | 2 | 182 | 121 | 303 |
| 14 | वर्धा | 230402 | 3 | 2 | 691 | 461 | 1152 |
| एकूण | | 2200000 | | | 6600 | 4400 | 11000 |

**Government of Maharashtra**

No.- Asuka-2015/C.R.112/CS-22,
Food, Civil Supplies & Consumer Protection Department, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralay Annex, Mumbai-400 032
Date :- 7th August, 2015.

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD Complex,
Dattapada Road, Rajendra Nagar,
Boriwali (E), Mumbai- 400 066.

**Sub :- Allocation of Foodgrains for APL (Saffron) cardholder farmers not included under NFSA, 2013 for the month of August, 2015.**

**Ref :-** 1) Govt. of India letter No.2/Maharashtra/2015-BP-III , Dt.5.8.2015
2) State Govt. Letter of even no. Dtd. 7th August, 2015.
3) State Govt. Resoluation of Dt. 24/7/2015

Sir,

Government of India vide its above referred letter dated 5/8/2015 has sanctioned additional allocation at applicable economic cost. Accordingly State Government has issued districtwise allocation orders for the month of August, 2015, vide above referred letter dated 7th August, 2015. (copy enclosed). State Government has also instructed its field authorities to purchase foodgrains at economic cost i.e. Rs. 2267/- per M.T. for Wheat and Rs. 3134/- per M.T. for Rice "A" Grade.

You are therefore requested to release the allocated quota to the nominees of District Collector's as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

V. D. Shevde

**(V. D. Shevde)**
**Under Secretary**
**Government of Maharashtra**

Copy to:1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.
2) Select file, Desk CS-22.